**मुद्दे** – शेतीची अवजारे, इंधन, लाकूड, कोळसा, घरबांधणीसाठी फर्निचर, जागा निर्मिती, कागद निर्मिती, कच्चा माल, औषधी गुणधर्म, जहाजबांधणी, पशुपालन या मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ५) टीपा लिहा. (कोणतेही दोन)**

१) **निर्वाणीकरणाचे पर्यावरणीय परिणाम**

**प्रस्तावना** – पृथ्वीवरील जंगलाचे आवरण नष्ट होण्याच्या प्रक्रियेला निर्वाणीकरण असे म्हणतात.

**मुद्दे** – भूजल पातळीत घट, आद्रतेत घट, वाळवंटीकरण, वन्य पशुपक्ष्याचा ऱ्हास, पर्यावरण असमतोल, मृदाधूप, पर्जन्य प्रमाणात घट, नद्यांना पूर, तापमानात वाढ, जनावराच्या चाऱ्याचा तुटवडा इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

२) **आम्ल पर्जन्य**

**प्रस्तावना** – आम्ल पर्जन्य व्याख्या

**मुद्दे** – आम्ल पर्जन्यामधील घटकांची नावे व परिणाम.

शारीरिक, मानसिक, ऐतिहासिक, स्थळे, पाणी, जमीन, शेती, प्राणी, पक्षी या मुद्द्यांचे स्पष्टीकरण. **समारोप.**

३) **सौरउर्जा**

**प्रस्तावना** – सौरउर्जा म्हणजे सुर्याच्या उष्णतेपासून निर्माण होणारी शक्ती म्हणजे सौरउर्जा होय.

**मुद्दे** – सौरउर्जेचे महत्त्व, सौरउर्जा वापरातील अडचणी, सौरउर्जेचे प्रकार व स्पष्टीकरण. या सर्व मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

४) **प्रदूषण अभ्यासाचे महत्त्व**

**प्रस्तावना** – पर्यावरणातील कोणत्याही घटकाचा भौतिक, रासायनिक किंवा जीवशास्त्रीय गुणधर्मामध्ये नको असणारा बदल म्हणजे प्रदूषण होय.

**मुद्दे** – प्रदूषणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना, प्रदूषणाची कारणे, परिणामाचा सखोल अभ्यास, हवा, पाणी व ध्वनी यांची कारणे शोधुन उपाय योजना करणे या मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

❀❀❀

# समाजशास्त्रीय विचारवंत (SS - 1)

**प्रश्न १) ऑगस्ट कॉम्ट यांचा मानवी समाजाच्या प्रगतीचा नियम स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक –** तीन अवस्थांचा नियम वा मानवी प्रगतीचा नियम याबाबतचे विचार मांडून कॉम्ट यांनी समाजशास्त्रात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली. मानवी बुद्धिमत्तेशी निगडीत असलेली प्रत्येक ज्ञानशाखा विकसित होत असताना ती प्रामुख्याने तीन वेगवेगळ्या परंतु एकानंतर एक अशा विशिष्ट क्रमाने तात्त्विक अवस्थांमधून मार्गक्रमण करते. या तीन अवस्था – १) ईश्वरशास्त्रीय/असत्य अवस्था – या अवस्थेच्या तीन उपअवस्था – अ) सर्व वस्तू चेतनावाद आ) अनेकेश्वरवाद इ) एकेश्वरवाद २) अध्यात्मिक/अमूर्त अवस्था ३) वैज्ञानिक/प्रत्यक्ष अवस्था.

**प्रश्न २) वेबरने नोकरशाहीची कोणती वैशिष्ट्ये, कार्ये आणि अपकार्ये सांगितली आहेत?**

**प्रस्तावना** – आधुनिक समाजातील अधिकार व सत्ता त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रातील तर्कसंगत दृष्टीकोनातून क्रिया करण्याचे वाढते प्रमाण या गोष्टींच्या अभ्यासामुळे वेबरचे लक्ष नोकरशाहीच्या अभ्यासाकडे वळले.

नोकरशाहीची वैशिष्ट्ये – श्रेणीव्यवस्था, कायद्याने कर्तव्ये, अधिकार निश्चीती, गुणवत्तेआधारे नेमणूक, गुंतागुंतीचे विशेष काम करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता, लेखी स्वरूपात काम, कामाला वेळेचे बंधन नाही त्यामुळे दिरंगाई, नियमांना महत्त्व, नोकरी हाच पेशा, दरमहा ठराविक वेतन, प्रामाणिकता आवश्यक, व्यक्तीला विशीष्ट स्थान, कनिष्ठ वरिष्ठांची मर्जी संपादण्याचा प्रयत्न, नोकरीची शाश्वती, कार्यक्षमतेसाठी बदल्या.

नोकरशाहीची कार्ये – आधुनिक समाजाचे व्यवस्थापन शक्य, मोठ्या प्रमाणावर उत्पादन शक्य, राजकीय सत्तेचे एकत्रिकरण शक्य.

नोकरशाहीची अपकार्ये – माणुसकीचा अभाव, दिरंगाई, कामात तोचतोचपणा, यांत्रिकपणा त्यामुळे नवीन प्रयोग करण्याची वृत्ती नष्ट, स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची प्रवृत्ती कमी, वेळकाढूपणा. **समारोप.**

**प्रश्न ३) सोरोकीनचे 'संस्कृतीविषयक विचार' यावर चर्चा करा.**

**प्रस्तावना** – 'सोशल ॲंड कल्चरल डायनॅमिक्स' या चार खंडात विभागलेल्या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात सोरोकीन यांनी सामाजिक – सांस्कृतिक परिस्थितीविषयीचे विचार मांडले आहेत. मानवी इतिहासाचा सखोल अभ्यास करून त्यांनी संस्कृतीविषयक विचार मांडले आहेत.

संस्कृतीचा अर्थ, संस्कृतीचा अभ्यास करण्याच्या तीन पद्धती – शुद्ध सांस्कृतिक पद्धती, सांस्कृतिक पद्धती, सामाजिक – सांस्कृतिक पद्धती.

संस्कृतीचे तीन प्रकार – भावनात्मक, चेतनात्मक, आदर्शात्मक संस्कृती या तीनही प्रकारच्या संस्कृतीची वैशिष्ट्ये. **समारोप.**

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **मार्क्सचे राज्याबद्दलचे विचार स्पष्ट करा.**

मार्क्सच्या मते समाजात राज्याचा जन्म आर्थिक शोषण करणाऱ्या भांडवलदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, त्यामुळे राज्य ही अन्याय्य संस्था, भांडवलशाहीत राज्याचे स्वरूप वर्गीय. असे राज्य नष्ट करण्याचे कार्य केवळ कामगारवर्गच करू शकेल.

२) **स्पेन्सरने सांगितलेले मानवी शरीर व समाज यामधील साम्य-भेद स्पष्ट करा.**

साम्य - समाज आणि शरीर या दोन्हीतही वैयक्तिक घटकांना वेगळे अस्तित्व नाही. दोन्हीचा हळूहळू विकास, सुक्ष्मतेतून सुरवात, अस्तित्वासाठी भोवतालच्या वातावरणावर अवलंबून एकात्मता व परस्परावलंबन, रचना विविध घटकांच्या एकत्रिकरणातून, उदय-वाढ-विकास या मार्गाने वाटचाल, एखाद्या भागात दोष निर्माण झाल्यास त्याचा परिणाम संपूर्णावर भेद-शरीराचा विकास निसर्गतः पण समाजाचा विकास समाजातील व्यक्तीवर अवलंबून, पेशींना शरीरात स्वतंत्र अस्तित्व नाही, पण व्यक्तीला समाजात स्वतंत्र अस्तित्व, शरीरात प्रत्येक अवयव विशिष्टच काम करतो पण असे समाजातील घटकांबाबत नाही.

३) **डरखीमचा धर्माचा सिद्धांत स्पष्ट करा.**

टायलर व मॅक्समुल्लरचे विचार, धर्म एक सामाजिक तथ्य, धर्माची व्याख्या, पवित्र-अपवित्र, श्रद्धा आणि विधी, कुलदेवकवाद

४) **परेटोचे अवशिष्टांचे प्रकार लिहा.**

प्रकार - एकत्रिकरणाची उपजत प्रवृत्ती, समूहाची स्थिरता टिकवून ठेवणारे घटक, बाह्य कृतींच्या सहाय्याने भावना व्यक्त करणारे अवशिष्ट, सामाजिकतेचे अवशिष्ट, व्यक्तिमत्वाचे संघटन करणारे अवशिष्ट, कामप्रवृत्तीच्या संदर्भातील अवशिष्ट.

**प्रश्न ५) टिपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **मार्क्सचे वर्गविषयक विचार**

मार्क्सच्या मते, समाजात वर्गाचा उगम व्यक्तीच्या उत्पादन पद्धतीशी असलेल्या संबंधातून, उत्पादन पद्धतीत व्यक्ती जी भूमिका बजावते त्यावरून तिचा वर्ग ठरतो. मानवी इतिहासाचा विचार करता सुरुवातीच्या काळात स्वामी-दास नंतर सरंजामदार-भूदास, भांडवलदार-कामगार असे वर्ग निर्माण. आधुनिक समाजात तीन वर्ग- कामगार, भांडवलशहा व जमीनदार, एक वर्ग मालक, शोषणकर्ता व शासक दुसरा वर्ग निर्धन, शोषित, या दोन वर्गातील हितसंबंध परस्परविरोधी आपल्या दुरवस्थेची जाणीव होऊन कामगार वर्ग संघटीत होऊन भांडवलदारांविरुद्ध संघर्ष करेल, अंतिम विजय कामगारांचा होऊन वर्गविरहीत समाज अस्तित्वात येईल.

२) **डरखीमचे आत्महत्येचे प्रकार**

प्रकार - १) आत्मकेंद्रीत आत्महत्या २) परार्थवादी आत्महत्या ३) प्रमाणकशुन्य आत्महत्या.

३) **परेटोने सांगितलेले तर्कविसंगत कृतीचे प्रकार**

प्रकार - १) नाही - नाही २) नाही - होय ३) होय - नाही ४) होय - होय

४) **सोरोकीनचे सामाजिक आंतरक्रियांचे प्रकार**

प्रकार - १) कौटुंबिक संबंध २) करारात्मक संबंध ३) सक्तीचे संबंध

❁❁❁

# ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र (SS - 2)

**प्रश्न १) ग्रामीण आणि नागरी समुदायातील फरक विशद करा.**

**प्रास्ताविक** – सोरोकीन व झिम्मरमन यांनी आपल्या 'नागरी–ग्रामीण समाजशास्त्राची मूलतत्त्वे' या पुस्तकात ग्रामीण व नागरी समुदायातील फरक काही तत्त्वे गृहीत धरून स्पष्ट केला आहे. व्यवसाय, पर्यावरण, समुदायाचा आकार, लोकसंख्येची घनता, सजातीयता आणि विजातीयता, सामाजिक भेद आणि स्तरीकरण, सामाजिक गतिशीलता, सामाजिक आंतरक्रिया या तत्त्वांच्या आधारे फरक स्पष्ट करता येईल.

**प्रश्न २) ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांवरील जातिव्यवस्थेचा प्रभाव स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – पारंपरिक ग्रामीण समाजरचनेचा आधार जात हीच होती. आधुनिक समाजात मात्र शेतीवर आधारित वर्ग निर्माण होऊ लागले आहेत.
प्रभाव – जात व ग्रामीण आर्थिक जीवन – १) उत्पादनपद्धती (कामाची विभागणी जातीनुसार), उपभोग्यता, कर्जबाजारीपणा (डॉ. आर. के. नेहरू – कनिष्ठ जाती – कर्जबाजारीपणा), राहण्याचे ठिकाण, गतिशीलता २) जात व संयुक्त कुटुंबपद्धती ३) जात व शैक्षणिक जीवन ४) जात व धार्मिक जीवन ५) जात व राजकीय जीवन ६) जात आणि सामाजिक मूल्ये. **समारोप.**

**प्रश्न ३) नगरातील भिकारी समस्येची कारणे व त्यावरील उपाय लिहा.**

**प्रस्तावना** – शहरीकरण व नागरीकरणामुळे नगरातील भिकाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे.
कारणे – आर्थिक, सामाजिक, जैविक व धार्मिक कारणे, नैसर्गिक आपत्ती.
उपाय – सर्व राज्यात समान कायदा, बेकारी व दारिद्र्य नष्ट करणे, बालसंगोपनगृहे व स्वागतालये, रोगराई नियंत्रण व उपाययोजना, राज्य पातळीवर भिकाऱ्यांचे पुर्नवसन, लोकमत जागृत करणे व निधी उभारणे. देशाच्या आर्थिक विकासात वाढ करणे, कायदेशीर तरतूद. **समारोप.**

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

१) **प्राचीन भारतातील नगरांचे प्रकार सांगा.**
प्रकार – नगर, पतन, द्रोणामुखी, खेता, खरवटा, निगमा, राजधानी, दुर्गा, सेनामुखी, शानिया, मठ/विहार, धार्मिक स्थळे.

२) **स्वातंत्र्यपूर्व काळातील जमिनविषयक संबंधांची चर्चा करा.**
स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात प्रामुख्याने भूस्वामित्वाच्या रयतवारी, महालवारी व जमीनदारी या पद्धती निरनिराळ्या प्रांतात होत्या.

३) **स्थलांतराचे प्रकार लिहा.**
प्रकार – अंतर्गत स्थलांतर, आंतरराष्ट्रीय स्थलांतर

४) **विसाव्या शतकातील जलद नागरीकरणास कारणीभूत घटकांची चर्चा करा.**
घटक – औद्योगिक क्रांती, व्यापारी, शेती क्रांती, वाहतुक व दळणवळण यातील वाढ, शिक्षणाच्या सोयीत वाढ, प्रशासकीय सोयी सुविधा, सुरक्षितता, शहर नियोजनाचे नवीन आराखडे.

प्रश्न ५) टिपा लिहा (कोणत्याही दोन)

१) **ग्रामीण समाजशास्त्राचे महत्त्व.**
कृषि व्यवसायातील मागासलेपण, ग्राम - भारतीय संस्कृतीचे उगमस्थान, सांस्कृतिक विविधता, ग्रामीण समस्या, नियोजन कार्यक्रम.

२) **ग्रामीण नागरी सातत्य**
ग्रामीण व नागरी समुदायात फरक असला तरी शुद्ध स्वरूपात ग्रामीण किंवा नागरी असा समाज आढळणे कठीण, काही शास्त्रज्ञांच्या मते या दोन स्वतंत्र व्यवस्था आहेत. तर अनेक विचारवंतांनी याला विरोध करून ग्रामीण नागरी सातत्याची कल्पना मांडली. वीर्थ, आर. ई. पाहल, पोकॉक, मॅक आयव्हर व पेज इ. चा यात समावेश आहे.

३) **नगरांची कार्ये**
कार्ये - संरक्षण, शासकीय व राजकीय, व्यापारविनिमय, औद्योगिक खनिज व औद्योगिक शहरे, विविध मार्गांचे केंद्रीभवन, धार्मिक व सांस्कृतिक, क्रीडा व आरोग्यप्रवर्तक कार्ये.

४) **नागरी शिक्षणाचे स्वरूप**
आधुनिक नागरी समाजात शिक्षणाची साधने (व्यवसाय), उत्पन्नाची साधने आणि राजकीय सत्ता सर्वांना खुली, व्यवसायांना अनुसरून प्रशिक्षण केंद्रे, औपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण, विशेषीकरणाला महत्त्व, शिक्षणाची सर्वांना समान संधी, खासगी व शासकीय संस्थांद्वारे शिक्षण, ठराविक शाळा, महाविद्यालयांमध्ये खूप गर्दी, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देणे शिक्षकांना अवघड.

❁❁❁

# भारताचे शासन आणि राजकारण (PS - 1)

**गृहपाठ १. भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – कोणत्याही देशाची राज्यघटना ही तेथील सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक अशा विविध परिस्थितीवर आधारित असते. या सर्व परिस्थितीचा प्रभाव भारताच्या राज्यघटनेवर पडलेला आहे.

**भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये** – जगातील सर्वात मोठी व लिखित राज्यघटना, परिवर्तनीयता व ताठरता यांचा समतोल जनतेचे सार्वभौमत्व, सार्वभौम, समाजवादी-धर्मनिरपेक्ष-लोकशाही-प्रजासत्ताक गणराज्य, भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकारांची नोंद, संसदीय शासनपद्धती, मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश, प्रौढ मताधिकार, एकेरी नागरिकत्व, अल्पसंख्यांकांना संरक्षण, धर्मनिरपेक्ष राज्य, कल्याणकारी राज्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था, द्विगृहात्मक कायदेमंडळ इत्यादी वैशिष्ट्ये थोडक्यात लिहिणे.

**समारोप** – वरीलप्रमाणे भारतीय राज्यघटनेची जी वैशिष्ट्ये आढळून येतात, त्यामुळे भारतीय राज्यघटना खऱ्या अर्थाने जगातील एक वैशिष्ट्यपूर्ण राज्यघटना बनली आहे.

**गृहपाठ २. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – व्यक्तीला एक नागरिक म्हणून आपला विकास करता यावा म्हणून राज्यघटनेद्वारे मूलभूत हक्क शब्दबद्ध करून नागरिकांच्या रक्षणासाठी मूलभूत हक्कांची तरतूद करण्यात आलेली आहे.

मूलभूत हक्क – १) समतेचा हक्क २) स्वातंत्र्याचा हक्क ३) शोषणाविरुद्धचा हक्क ४) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क ५) सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क ६) मालमत्ताविषयक हक्क ७) घटनात्मक उपायांबाबतचे हक्क वरील मूलभूत हक्क थोडक्यात स्पष्ट करावे.

**समारोप** – भारतीय राज्यघटनेने मूलभूत हक्कांना अतिशय महत्व दिले असून, त्यांची सविस्तर तरतूद राज्यघटनेमध्ये केलेली आढळते.

**गृहपाठ ३. भारतातील स्थानिक स्वराज्य शासनसंस्थेचा अर्थ, वैशिष्ट्ये, महत्त्व आणि समस्या यांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – स्थानिक स्वराज्य संस्था ही ब्रिटिशांची देणगी आहे असे जरी आपण म्हणत असलो, तरी ब्रिटिशपूर्व काळातही त्या अस्तित्वात होत्या.

स्थानिक स्वराज्य शासनसंस्थेचा अर्थ – अर्थ व व्याख्या लिहिणे.

वैशिष्ट्ये – कायद्याद्वारे निर्मिती, स्थानिक लोकांचा सहभाग, स्थानिक नियंत्रणाचा अधिकार, कर लादण्याचा अधिकार

| | | | |
|---|---|---|---|
| महत्त्व – १) | लोकशाहीची पाठशाळा | २) | राजकीय शिक्षणाचे उपयुक्त माध्यम |
| ३) | राज्य व स्थानिक लोकांतील दुवा | ४) | कार्याचे विभाजन |
| समस्या –१) | आर्थिकदृष्ट्या कमजोर | २) | पुरेशा अधिकारांचा अभाव |
| ३) | योग्य नेतृत्वाचा अभाव | ४) | लोकांची उदासीनता |
| ५) | गटबाजी | ६) | विषमता कमी करण्यात अपयश |
| ७) | सत्तेचे राजकारण इ. समस्या | | |

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

गृहपाठ ४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)

अ) **महाराष्ट्रातील जात व राजकारण यांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – ब्राह्मण जातीचे राजकारण
- मराठा जातीचे राजकारण
- मुस्लिम जातीचे राजकारण
- इतर मागास जातींचे (OBC) राजकरण. **समारोप.**

आ) **भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातील पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

**अ) सार्वभौम राज्य** **आ) धर्मनिरपेक्ष**
**प्रस्तावना** – भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी लिहिणे. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातील संकल्पना –
**अ) सार्वभौम राज्य–** भारताने राज्यघटनेचा स्वीकार केल्यानंतर भारत परकीय किंवा अंतर्गत शक्तींच्या नियंत्रणामधून पूर्णतः मुक्त आहे हे जगाला निक्षून सांगण्याकरिता सार्वभौम या शब्दाचा प्रयोग राज्यघटनेमध्ये केलेला आहे.
**आ) धर्मनिरपेक्ष–** भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'धर्मनिरपेक्षता' या शब्दाचा ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे समावेश करण्यात आला आहे. भारत हे एक धर्मनिरपेक्ष राज्य आहे. भारतीय राज्यघटनेद्वारे भारतीयांना धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले आहे.
**समारोप** – सार्वभौम राज्य, धर्मनिरपेक्षता या तत्त्वांचा आदर्श म्हणून गौरव करणारी भारताची राज्यघटना आहे.

इ) **भारतीय संघराज्याचे स्वरूप विशद करा.**

**प्रस्तावना** – संघराज्य पद्धती कशास म्हणतात ते थोडक्यात स्पष्ट करणे. भारतीय संघराज्याचे स्वरूप – पुढील मुद्यांच्या आधारे भारतीय संघराज्याचे स्वरूप विशद करणे.
१) केंद्र व राज्यातील वैधानिक संबंध आणि अधिकार वाटप
२) केंद्र व राज्यातील प्रशासकीय संबंध आणि अधिकार वाटप
३) केंद्र व राज्यातील आर्थिक संबंध आणि अधिकार वाटप
इत्यादींचे स्पष्टीकरण थोडक्यात लिहावे.
**समारोप** – वरील सर्व मुद्यांवरून भारतीय संघराज्य केंद्रीकरणाकडे झुकलेले आहे, असे लक्षात येते.

ई) **१९७७ नंतरच्या भारतीय राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – १९७५ च्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर झालेली १९७७ ची निवडणूक ही अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरली. याबाबत थोडक्यात लिहिणे. १९७७ नंतरच्या भारतीय राजकारणावर प्रभाव टाकणारे घटक –
१) काँग्रेसच्या प्रभावात तुलनात्मक घट
२) केंद्रानुवर्तित्वामुळे घटकराज्यात अस्थिरता
३) राज्य पातळीवर नव्या राजकीय शक्तींचा उदय
४) सीमावर्ती राज्यात अस्थिरता
५) काँग्रेसला एकमेव राष्ट्रव्यापी पर्याय उभा करण्यातील असमर्थता
**समारोप** – वरील घटकांचा सविस्तर अभ्यास केल्यास असे दिसून येते की, सर्व राजकीय पक्षांची राष्ट्रीय हितास प्राधान्य देणारे राजकारण करणे ही काळाची गरज बनली आहे.

**गृहपाठ ५. टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) राष्ट्रपतींचे अधिकार व कामे**

**प्रस्तावना** – राष्ट्रपतींबाबतची माहिती प्रास्ताविक रूपाने लिहावी. राष्ट्रपतींचे अधिकार व कामे–
१) प्रशासकीय अधिकार २) विधिविषयक अधिकार ३) न्यायविषयक अधिकार ४) आर्थिक अधिकार ५) आणीबाणीचे अधिकार
वरील अधिकार व कामे थोडक्यात लिहिणे.

**समारोप** – राष्ट्रपतींना जे व्यापक अधिकार राज्यघटनेने दिले आहेत ते प्रत्यक्षात केंद्रीय कार्यकारी मंडळ व संसदेचे आहेत.

**आ) भारतीय संसदेची रचना**

**प्रस्तावना** – भारताच्या शासनव्यवस्थेमध्ये भारतीय संसदेचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. संसद कायदा करणे आणि कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार असते.

**भारतीय संसदेची रचना –**

१) भारतीय संसद द्विगृही आहे.
  १) राज्यसभा २) लोकसभा या दोन सभागृहांबाबत माहिती लिहिणे अपेक्षित आहे.
२) संसद सदस्यांची पात्रता
३) अपात्रतेबाबतचे नियम
४) संसद सदस्यांना मिळणारे संरक्षण

वरील सर्व मुद्यांच्या आधारे भारतीय संसदेची रचना थोडक्यात लिहिणे.

**समारोप** – भारताने लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष समाजाची उभारणी करण्याचे उद्दिष्ट घटनात्मक मार्गाने साकार करण्याचे ठरविले असल्यामुळे भारतीय संसदेस भारताच्या राजकारणात अनन्यसाधारण महत्त्वाचे स्थान आहे.

**इ) हिंदी आणि इंग्रजी भाषेच्या समर्थनार्थ आणि विरोधात मांडण्यात येणारे मुद्दे**

**प्रस्तावना** – विचारांची देवाणघेवाण करण्याचे भाषा हे एक प्रमुख साधन आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांची शासकीय कामकाजाची भाषा साहजिकच इंग्रजी हीच होती. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मात्र एखादी 'आपली' भाषा हीच राष्ट्र भाषा असावी म्हणून हिंदी या भाषेचा 'राष्ट्रभाषा' म्हणून स्वीकार केला.

**हिंदी आणि इंग्रजीच्या समर्थनार्थ व विरोधी मांडण्यात येणारे मुद्दे –** इंग्रजी भाषा परकीय, ब्रिटिश साम्राज्यशाहीचे प्रतिक म्हणून विरोध याउलट हिंदी स्वदेशी, साधी, सोपी व येथील संस्कृती, परंपरा यांच्याशी निगडीत असलेली भाषा आहे.

इंग्रजीचे समर्थन करणाऱ्यांच्या मते, इंग्रजी ही समृद्ध भाषा आहे. ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे तुमचे मत सारांश रूपाने लिहावे.

**ई) भारतातील नियोजन**

**प्रस्तावना** – नियोजनाची व्याख्या लिहिणे.

भारतातील नियोजन –

१५ मार्च १९५० रोजी भारतीय नियोजन मंडळाची स्थापना केली.

नियोजन मंडळाची रचना लिहिणे अपेक्षित आहे. याशिवाय भारतातील नियोजनाची उद्दिष्टे लिहावीत.

**समारोप** – नियोजनाच्या यशापयशाबाबत थोडक्यात लिहावे.

❁❁❁

# भारतीय राजकीय विचारवंत (PS - 2)

**गृहपाठ १. न्या. रानडे यांच्या राज्यविषयक विचारांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – न्या. रानडे यांनी कोणतेही राज्यविषयक तत्त्वज्ञान मांडले नाही. परंतु त्यांनी राज्याला व्यक्ती जीवनात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

न्या. रानडे यांचे राज्यविषयक विचार – १) राज्याचे स्वरूप २) राज्याची कार्ये – सामाजिक कार्ये, आर्थिक कार्ये, धार्मिक व सांस्कृतिक कार्ये, राजकीय कार्ये, इतर कार्ये इत्यादी थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – न्या. रानडे यांनी आपल्या राज्यविषयक विचारांमध्ये आदर्शवाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि उदारमतवाद यांचा समन्वय साधला आहे.

**गृहपाठ २. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी दिलेल्या योगदानाची उदाहरणासह चर्चा करा.**

**प्रस्तावना** – अस्पृश्यांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचे वर्णन थोडक्यात लिहिणे.

डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यांसाठीचे योगदान –

अस्पृश्यांच्या विकासासाठी डॉ. आंबेडकरांनी पहिल्या गोलमेज परिषदेत काही मागण्या मांडल्या. पुणे करार, मजूर पक्षाची स्थापना, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, बौद्ध धर्माचा स्वीकार इत्यादी महत्वपूर्ण मुद्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी दिलेल्या योगदानाची उदाहरणासह सविस्तर चर्चा करावी.

**समारोप**–डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्यांच्या विकासातील योगदान वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने लिहावे.

**गृहपाठ ३. डॉ. राममनोहर लोहिया यांचे समाजवादासंबंधीचे विचार स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – डॉ. लोहिया हे भारतातील एक समाजवादी विचारवंत होते.

भारताच्या संदर्भात डॉ. लोहिया यांनी समाजवादी विचारसरणी मांडली. डॉ. लोहिया यांचे समाजवादासंबंधी विचार – १) भांडवलशाहीला विरोध २) साम्यवाद अमान्य ३) उत्पादन साधनांवर व्यक्तीच्या खाजगी मालकीला विरोध ४) मोठ्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण ५) समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी ११ सुत्री कार्यक्रम ६) अल्पप्रमाणात यंत्राचा वापर ७) मागासलेल्या जाती जमाती ८) किमती ९) शेती १०) चौखांबी राज्य ११) विश्वराज्य

वरील मुद्यांच्या आधारे डॉ. लोहिया यांचे समाजवादासंबंधीचे विचार लिहावेत.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ४. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) राजा राममोहन रॉय यांचे कायदाविषयक विचार सांगा.**

**प्रस्तावना** – लोकांच्या इच्छा, आकांक्षा, रूढी आणि परंपरा इ. गोष्टी लक्षात घेऊन कायदे करणे अपेक्षित असते असे रॉय यांना वाटते.

रॉय यांचे कायदाविषयक विचार –

१) ब्रिटिश संसदेलाच भारतासाठी कायदा करण्याचा अधिकार
२) इंग्लंडच्या अभिजात लोकमताच्या हातीच भारतासाठी कायदेनिर्मितीची सत्ता असावी.
३) कायद्याचे संहितीकरण
४) ब्रिटिश संसदेने भारतासाठी कायदे करावेत असे रॉय सुचवितात.
५) भारतातील रूढी व परंपरा लक्षात घेऊन कायदे करावेत.

वरील मुद्यांच्या आधारे रॉय यांचे कायदाविषयक विचार लिहावेत.

**समारोप** – रॉय यांच्या कायदेविषयक विचारांचे मूल्यमापन थोडक्यात लिहावे.

आ) **न्या. रानडे यांच्या सामाजिक विचारांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – न्या. रानडे यांच्या काळातील भारतात असणारी सामाजिक परिस्थिती कशी होती याचे थोडक्यात विवेचन करणे. न्या. रानडे यांचे सामाजिक विचार –

१) भारतीय समाजाच्या उणिवा  २) सामाजिक सुधारणांची उद्दिष्ट्ये  ३) सामाजिक सुधारणेच्या पद्धती  ४) आधी राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा?

वरील मुद्यांच्या आधारे न्या. रानडे यांचे सामाजिक विचार थोडक्यात लिहावे.

**समारोप** – न्या. रानडे यांनी स्वतः सामजिक सुधारणेसाठी केलेले प्रयत्न सारांश रूपाने लिहिणे अपेक्षित आहे.

इ) **लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' का म्हटले जाते?**

**प्रस्तावना** – आधुनिक भारताच्या राजकीय इतिहासात लोकमान्य टिळक ही एक महान व्यक्ती होऊन गेली. स्वराज्य हे त्यांचे ध्येय होते. लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे ब्रिटिशांनी म्हटले आहे. लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले जाते याची कारणमीमांसा –

१) सहकाराचे उत्तर सहकाराने देण्यावर भर  २) तिहेरी स्वरूपाचे कार्य  ३) राष्ट्रीय आंदोलनाला निश्चित ध्येयाची बैठक  ४) वस्तुनिष्ठ व्यवहारी भूमिका इत्यादी मुद्यांच्या आधारे या प्रश्नाचे उत्तर लिहावे.

**समारोप** – भारतीय राष्ट्रीय चळवळीला नवी दिशा देऊन, लोकमत जागृत करून, लोकांच्या असंतोषाला संघटित करून स्वराज्याचे आपले ध्येय प्राप्त करण्याचा लोकमान्य टिळकांनी प्रयत्न केला.

ई) **महात्मा गांधींचे धर्म व राजकारण याबाबतचे विचार स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – गांधींच्या मते, धर्माशिवाय राजकारणाची कल्पनाच केली जाऊ शकत नाही. भारताच्या धार्मिक वारशाचा खूप खोल ठसा गांधींच्या राजकारणावर उमटलेला होता.

महात्मा गांधींचे धर्म व राजकारण याबाबत विचार –

महात्मा गांधींच्या मते, राजकारणाचे आधात्मीकरण व्हावे. महात्मा गांधींच्या राजकारणात सत्याची व न्यायाची प्रतिष्ठापना, सत्य व अहिंसा ही मूलतत्त्वे होती. धर्म व राजकारण यांची फारकत महात्मा गांधी यांना मान्य नाही. मानवता धर्म, ईश्वरावर श्रद्धा, सर्वधर्मसमानता इत्यादी मुद्यांच्या आधारे महात्मा गांधींचे धर्म व राजकारण याबाबत विचर थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

गृहपाठ ५. टीपा लिहा. **(कोणत्याही दोन)**

अ) **लोकमान्य टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम**

**प्रस्तावना** – स्वराज्य हे भारतीय जनतेचे ध्येय होते. हे ध्येय साध्य करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी भारतीय जनतेसमोर आपला चतुःसूत्री कार्यक्रम ठेवला. लोकमान्य टिळकांचा चतुःसूत्री कार्यक्रम –

१) स्वराज्य  २) स्वदेशी  ३) बहिष्कार  ४) राष्ट्रीय शिक्षण या मुद्यांची थोडक्यात चर्चा करणे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

आ) **महात्मा गांधी यांची 'सत्याग्रहाची' संकल्पना**

**प्रस्तावना** – महात्मा गांधींच्या सत्य व अहिंसा व तत्त्वांविषयी थोडक्यात लिहिणे.

सत्याग्रह – सत्याग्रह या संकल्पनेत असहकार, हरताळ, सामाजिक बहिष्कार, धरणे, सविनय कायदेभंग, हिजरत, उपोषण, संप इत्यादी सत्याग्रहाचे मार्ग स्पष्ट करणे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

इ) **डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीसंबंधी विचार**

**प्रस्तावना** - डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीसंबंधी विचार भारताच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीच्या अवलोकनातून निर्माण झाले आहे. डॉ. आंबेडकर हे लोकशाहीचे पुरस्कर्ते होते.

डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीसंबंधी विचार -

१) लोकशाही शासनपद्धतीच आदर्श का वाटत होती याची कारणमीमांसा लिहिणे.

२) संसदीय लोकशाही शासनपद्धतीचे समर्थन

३) भारताच्या बाबतीत संसदीय शासनपद्धती यशस्वी होईल का? याची देखील कारणमीमांसा लिहिणे.

४) संसदीय लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक उपाय स्पष्ट करणे.

वरील सर्व मुद्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांचे लोकशाहीसंबंधीचे विचार थोडक्यात लिहिणे.

**समारोप** - स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या आधारावर भारतात राजकीय आणि सामाजिक स्वरूपाची लोकशाही प्रस्थापित करावी अशी तळमळ डॉ. आंबेडकर आपल्या विचारातून व्यक्त करतात.

ई) **डॉ. लोहिया यांचे स्वातंत्र्याविषयी विचार**

**प्रस्तावना** - व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचे लोहिया यांना जबरदस्त आकर्षण होते. ते स्वातंत्र्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानत होते.

डॉ. लोहिया यांचे स्वातंत्र्याविषयी विचार -

१) व्यक्तिविकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते.

२) व्यक्ती नियंत्रण व नियोजनापासून मुक्त हव्यात.

३) व्यक्तिविकास ही मानवी कल्याणाची अत्यावश्यक बाजू असते.

४) स्वातंत्र्याचे दोन भाग (स्वातंत्र्याचे वर्गीकरण)

५) प्रतिकाराचा हक्क मान्य

वरील मुद्यांच्या आधारे डॉ. लोहिया यांचे स्वातंत्र्याविषयीचे विचार थोडक्यात लिहिणे.

❁❁❁

# सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र (ES - 1)

**प्रश्न १) मागणीची लवचिकता म्हणजे काय? मागणीची किंमत व उत्पन्न लवचिकता स्पष्ट करा.**

मागणीच्या लवचिकतेची व्याख्या लिहून स्पष्ट करावी, मागणीच्या लवचिकतेचे चार प्रकार सांगून त्यापैकीच असणारे दोन प्रकार म्हणजे किंमत व उत्पन्न लवचिकता सविस्तर स्पष्ट करावेत

१) मागणीची किंमत लवचिकता - व्याख्या स्पष्ट करावी, सूत्र स्पष्ट करावे, त्यानंतर पुढील पाच प्रकार आकृतिसह थोडक्यात स्पष्ट करावेत, पूर्ण लवचिक मागणी, पूर्ण अलवचिक मागणी, लवचिक मागणी, अलवचिक मागणी, एकक लवचिक मागणी.

२) मागणीची उत्पन्न लवचिकता - सूत्र स्वरूपात स्पष्ट करावी.

**प्रश्न २) मक्तेदारी म्हणजे काय? मक्तेदारीची वैशिष्ट्ये सांगा.**

बाजारपेठेच्या विविध प्रकारांपैकी एक महत्त्वाचा प्रकार - मक्तेदारीची व्याख्या लिहून स्पष्ट करावी, मक्तेदारीची पुढील सर्व वैशिष्ट्ये प्रत्येकी चार-पाच ओळीत स्पष्ट करावीत. एकच उत्पादक, एकच विक्रेता, मुक्त प्रवेशाचा अभाव, वस्तुला नजिकचा पर्याय नसतो, मक्तेदारच किंमत कर्ता असतो, महत्तम नफा मिळतो, उद्योगसंस्था उद्योग एकच असतो, मागणी वक्र डावीकडून उजवीकडे उतरणारा असतो, सरासरी प्राप्ती पेक्षा सीमांत प्राप्तीतील घट जास्त असते, मूल्यभेद केला जातो. इ.

वरील वैशिष्ट्यांनी युक्त बाजारपेठ म्हणजे मक्तेदारी बाजारपेठ होय. मात्र प्रत्यक्ष बाजारपेठेत अशी परिस्थिती आढळून येत नाही. तात्त्वीक विवेचनासाठी मात्र मक्तेदारीचा अभ्यास केला जातो.

**प्रश्न ३) बदलत्या प्रमाणांचा सिद्धान्त आकृतीसह स्पष्ट करा.**

'तुलनात्मकदृष्ट्या काही घटकांची गुंतवणूक स्थिर असताना जर इतर काही घटकांचे गुंतवणुकीचे प्रमाण वाढविले तर उत्पादनात वाढ होईल. मात्र विशिष्ठ मर्यादा गाठल्यानंतर गुंतवणुकीत त्याच प्रमाणात वाढ केली तरी उत्पादन वाढीचा दर घटत जाईल', हा सिद्धान्त लिहून थोडक्यात स्पष्टीकरण करावे.

नंतर सिद्धान्ताची गृहिते लिहावीत.

अल्पकाळात काही उत्पादनघटक स्थिर व काही बदलत्या प्रमाणात वापरले असता, होणाऱ्या परिणामांचे तीन टप्पे वर्णन करावेत. त्याआधारे आकृती काढून आकृतीचे स्पष्टीकरण करावे. तीन टप्प्यात आढळणाऱ्या प्रवृत्तीचे स्पष्टीकरण करावे.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम स्पष्ट करा.**

घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम सांगून तो स्पष्ट करावा, घटत जाणाऱ्या सीमांत उपयोगितेचा तक्ता तयार करून त्याचे थोडक्यात स्पष्टीकरण करावे, तक्त्यातील आकडेवारीच्या आधारे आकृतीसह स्पष्टीकरण करावे. सिद्धांताची गृहिते, अपवाद थोडक्यात लिहावेत.

**ब) मागणीचा नियम स्पष्ट करा.**

मागणीचा नियम सांगून तो स्पष्ट करावा, एखाद्या वस्तूचे उदाहरण घेऊन बाजारपेठेतील मागणी तक्ता तयार करावा, त्या आधारे मागणीवक्र काढून आकृतीचे स्पष्टीकरण करावे, नियमास असणारे अपवाद थोडक्यात सांगून उदाहरणे द्यावीत.

**क) पुरवठ्याचा नियम स्पष्ट करा.**

पुरवठ्याचा नियम सांगून तो स्पष्ट करावा, एखाद्या वस्तुचे उदाहरण घेऊन बाजारपेठेतील पुरवठा तक्ता तयार करावा, त्याआधारे पुरवठा वक्राची आकृती काढून स्पष्टीकरण करावे. अपवाद, गृहिते थोडक्यात स्पष्ट करावीत, उदाहरणे द्यावीत.

**ड) सरासरी व सीमांत खर्च म्हणजे काय? त्यांच्यातील संबंधासह स्पष्ट करा.**

सरासरी व सीमांत खर्चाची व्याख्या लिहावी, सरासरी व सीमांत खर्च कसा मोजता येतो ते स्पष्ट करावे, नंतर खर्च वक्र एकत्रित दर्शविणारी आकृती काढून स्पष्टीकरण करावे, दोन्ही खर्चातील संबंध दर्शविणारे तीन मुद्दे लिहावेत, एखाद्या उदाहरणासह स्पष्टीकरण द्यावे.

**प्रश्न ५) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) मूल्यभेद -**

मूल्यभेदाची व्याख्या लिहावी, कोणत्या प्रकारच्या बाजारपेठेत तो शक्य असतो ते सांगावे, मूल्यभेदाचे व्यक्तीनुसार, स्थानानुसार, व्यवसायानुसार, वेळेनुसार केलेला मूल्यभेद असे चार प्रकार आढळतात. ते उदाहरणासह स्पष्ट करावेत. मूल्यभेद केव्हा शक्य असतो व तो केव्हा फायदेशीर ठरतो हे थोडक्यात स्पष्ट करावे.

**ब) मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ -**

मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाची संकल्पना थोडक्यात स्पष्ट करावी. मार्शल यांनी मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे अनेक फायदे सांगितलेले आहेत- मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळे अंतर्गत व बाह्य असे दोन स्वरूपाचे लाभ होतात.

अ) अंतर्गत लाभ - तांत्रिक बचत, धोके पत्करण्याची बचत इ. ब) बाह्य लाभ- स्थानियीकरणाच्या बचती, माहिती व ज्ञान याबाबतच्या बचती, विशेषीकरणाच्या बचती इ. मुद्दे स्पष्ट करावेत.

**क) विक्री खर्च -**

विक्री खर्चाची व्याख्या लिहून ती थोडक्यात स्पष्ट करावी. विक्री खर्च व उत्पादन खर्च यातील फरक, विक्री खर्च केव्हा करावा लागतो, विक्री खर्चाचे परिणाम या तीन मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक, विक्री खर्चामुळे वस्तुच्या किंमत पातळीत वाढ होते; परंतु तरीही या खर्चात दिवसेंदिवस वाढ होताना दिसते.

**ड) व्याजाचा रोखता प्राधान्य सिद्धांत -**

केन्स यांनी मांडलेला एक महत्त्वाचा सिद्धांत, थोडक्यात स्पष्टीकरण करावे. पैशाच्या मागणीचे तीन हेतू स्पष्ट करून पैशाच्या पुरवठ्याची बाजू सांगणे आवश्यक, पैशाची मागणी व पुरवठा या आधारे आकृती काढून तिचे स्पष्टीकरण करावे, सिद्धांताचे परीक्षण थोडक्यात लिहावे.

❁❁❁

# विकासाचे अर्थशास्त्र (ES - 2)

**प्रश्न १) मागासलेल्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

मागासलेल्या किंवा अविकसित अर्थव्यवस्थेची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. वैशिष्ट्ये स्पष्ट करताना पुढील मुद्द्यांचे विश्लेषण आवश्यक - अल्प दरडोई उत्पन्न, दरडोई अल्प भांडवल, प्राथमिक स्वरूपाचे उत्पादन, आधुनिक तंत्रज्ञानाचा कमी वापर, श्रमिकांची कमी कार्यक्षमता, प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबित्व, लोकसंख्यावाढीचे मोठे प्रमाण, बेकारीचे मोठे प्रमाण, साधन-सामग्रीचा अपूरा वापर, अनुकूल जीवन मूल्याचा अभाव, भांडवल बाजाराची अपूर्णता, प्रशासनाचे स्वरूप, आर्थिक विषमता इत्यादी.

**प्रश्न २) विकासाचे आर्थिक व आर्थिकेतर घटक स्पष्ट करा.**

आर्थिक विकासावर अनेक आर्थिक व आर्थिकेतर घटकांचा परिणाम होतो. पुढील घटकांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**आर्थिक घटक -** साधनांचा पर्याप्त वापर, साधन-सामग्रीची विभागणी, उत्पादन सीमा, भांडवल, संयोजन कौशल्य, तंत्रज्ञान इत्यादी.

**आर्थिकेतर घटक -** राजकीय स्थैर्य, प्रशासकीय कार्यक्षमता, नेतृत्व, रूढी-परंपरा, लोकसंख्या, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी.

**प्रश्न ३) आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळे स्पष्ट करा.**

प्रत्येक राष्ट्रातील भौगोलिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती, परंपरा, विचार भिन्न असल्याने आर्थिक विकासाच्या मार्गात सर्वच विकसनशील देशांना कमी - जास्त प्रमाणात अडथळ्यांना तोंड द्यावे लागते.

अडथळे स्पष्ट करताना पुढील मुद्यांचा आधार घेऊन उदाहरणासह सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. परकीय राजवटीचा परिणाम, बाजाराची अपूर्णता, दुष्टचक्रांचे अस्तित्व, भांडवलाची कमतरता, सामाजिक व सांस्कृतिक अडथळे, आंतरराष्ट्रीय घटक इ.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) भांडवल निर्मितीचे परकीय मार्ग सांगा.**

भांडवल निर्मितीची व्याख्या थोडक्यात स्पष्ट करावी, भांडवल निर्मितीचे दोन प्रमुख मार्ग- देशांतर्गत मार्ग व परकीय मार्ग. यापैकी परकीय मार्गामध्ये परकीय मदत, आयातीवर नियंत्रण, अनुकूल व्यापारशर्ती या मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक, सारांश स्वरूपात परकीय मार्गाचे महत्त्व सांगणे आवश्यक.

**ब) उत्पादन तंत्राची निवड कोणत्या घटकांवर अवलंबून असते?**

उत्पादन तंत्राचे दोन प्रकार- श्रमप्रधान व यंत्रप्रधान उत्पादन पद्धती, उत्पादनाचे कोणते तंत्र निवडावे यावर पुढील घटकांचा प्रभाव पडतो. आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे, उत्पादन घटकांचा पुरवठा, देशातील तांत्रिक पातळी, भांडवलाची उपलब्धता, लोकसंख्या, इ.

**क) तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करा.**

**तंत्रज्ञानाची व्याख्या -** तंत्रज्ञान म्हणजे कोणतेही पद्धतशीर ज्ञान, जे शास्त्रीय प्रयोगावर आधारीत असते व ज्याच्यामुळे समाजाची वस्तू व सेवा निर्मितीची क्षमता वाढते. थोडक्यात स्पष्टीकरण.

**महत्त्व स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे विश्लेषण आवश्यक -** उत्पादन घटकांत वाढ न करता उत्पादनात वाढ, वाढीस मदत, कार्यक्षमतेत वाढ, टंचाईवर मात इत्यादी.

**ड) परकीय मदतीचे स्वरूप स्पष्ट करा.**

परकीय मदतीच्या संकल्पनेचे थोडक्यात स्पष्टीकरण. स्वरूप स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे विश्लेषण आवश्यक - अनुदान, सुलभ कर्ज, तांत्रिक मदत, खासगी भांडवल, परकीय सहयोग, विदेशी सरकारचे कर्ज, आंतरराष्ट्रीय कर्ज व मदत इत्यादी.

**प्रश्न ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) विकास प्रक्रियेतील शासनाची भूमिका -**

राष्ट्राच्या विकासात शासनाची भूमिका महत्त्वाची, सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण, शिक्षण, सामाजिक सुविधा, आर्थिक सुविधा, शेती सुधारणा, औद्योगिक विकास, चलन विषयक धोरण, इ. बाबतीत सरकारची भूमिका स्पष्ट करावी.

**ब) विदेशी भांडवलाचे फायदे -**

आर्थिक विकासात विदेशी भांडवलाचे महत्त्व असते. अनेक फायदे, गुंतवणूक वाढते, औद्योगिकीकरणास चालना, मोठ्या उद्योगांची स्थापना, वाहतूक क्षेत्रात सुधारणा, लोहपोलाद उद्योगांची स्थापना या मुद्यांचे स्पष्टीकरण करावे.

**क) भांडवलाच्या मागणीवरील मर्यादा.**

अल्पविकसित देशात भांडवल गुंतवणूक महत्त्वाची. परंतु भांडवलाच्या मागणीवर प्रत्यक्षात अनेक मर्यादा. पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक - मर्यादित बाजारपेठ, बेकारीचे मोठे प्रमाण, मागास तंत्रज्ञान, संयोजकाचा अभाव, आवश्यक सोईंचा अभाव, व्याजाचा दर, करविषयक धोरण, कायदेशीर तरतूदी इत्यादी.

**ड) अति उपभोगावस्था -**

रोस्टोव यांनी आपल्या विकासाच्या अवस्थांचा सिद्धान्त मांडलेला आहे. या सिद्धान्तातील अति उपभोगावस्था ही शेवटची अवस्था त्यांनी स्पष्ट केलेली आहे. या अवस्थेत दिसून येणाऱ्या तीन गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक. अतिउपभोगावस्था प्राप्त करणाऱ्या देशाचे उदाहरण देणे आवश्यक.

❁❁❁

# प्राचीन भारत (इ.स. १२०० पर्यंत)- (HS – 1)

प्र. १) **चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्यविस्ताराचे वर्णन करून त्याच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना** – चंद्रगुप्त कोण होता?

चंद्रगुप्त मौर्य – साम्राज्यविस्तार, योग्यता – प्रचंड साम्राज्याचा निर्माता, महान क्रांतिकारक, समर्थ नेतृत्व, कल्याणकारी प्रशासक, महान त्यागी.

**समारोप** – मौर्यांचे साम्राज्य हे भारतातील पहिले मोठे साम्राज्य. त्याची पायाभरणी चंद्रगुप्ताने केली. तसेच परकियांच्या आक्रमणाला समर्थपणे तोंड दिले.

प्र. २) **समुद्रगुप्ताच्या कर्तृत्वाचे वर्णन करा.**

**प्रस्तावना** – समुद्रगुप्त कोण होता?

समुद्रगुप्ताचे कर्तृत्व – साम्राज्यविस्तार, मांडलिकत्वाच्या पध्दतीचा अवलंब विविध सत्तांशी मैत्री करार, अश्वमेध यज्ञस नाणी, योग्यता.

**समारोप** – भारतातील सरंजामशाहीचा उद्‌गाता म्हणून समुद्रगुप्ताचे महत्त्व.

प्र. ३) **प्राचीन भारतातील सरंजामशाहीचे वर्णन करा.**

**प्रस्तावना –** खरे पाहाता सरंजामशाही ही मध्ययुगातील महत्त्वपूर्ण राजकीय व सामाजिक संस्था होती. युरोपप्रमाणेच भारतातही ही व्यवस्था प्रचलित होती. भारतात या व्यवस्थेचा जन्म प्राचीन काळातच झालेला दिसून येतो.

प्राचीन भारतातील सरंजामशाही अथवा सामंतशाही –

मांडलिक व्यवस्था – हेतू व पध्दती

सामाजिक व धार्मिक सामंतशाही

**समारोप –** मध्ययुगामध्ये नवी राज्ये व साम्राज्ये स्थापन होताना प्राचीन सरंजामशाहीचा काही अंशी राजकीय सरंजामशाहीचे स्वरूप काहीसे बदलत गेले. तसेच प्राचीन भारतातील सरंजामशाहीचे स्वरूप मध्ययुगीन युरोपातील सरंजामशाहीपेक्षाही भिन्न होते.कारण मुळातच प्राचीन भारतातील सरंजामशाहीच्या उदयामागील प्रेरणा व गरजा यांचे स्वरूपच मध्ययुगीन राजकीय प्रेरणांपेक्षा वेगळे होते.

प्र. ४) **खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणत्याही दोन)**

अ) **इतिहासाच्या स्वरूपाचे वर्णन करा.**

**प्रस्तावना** – इतिहास म्हणजे काय?

इतिहासाचे स्वरूप – इतिहास एक शास्त्र व कलाकृती, इतिहासाची व्यक्तिनिष्ठता, गटनिष्ठता, परिवर्तनशीलता, कालसापेक्षता, वर्तमानकाळ व भूतकाळ यांच्यातील कधी न संपणारा संवाद, इतिहासाची व्यापकता, समन्वितता. **समारोप.**

ब) **भारताच्या प्राचीन इतिहासाच्या भौतिक/पुरातत्त्वीय संदर्भसाधनांची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – संदर्भसाधने म्हणजे काय? संदर्भसाधनांचे प्रकार.

भौतिक साधने – अवशेष, स्मारके, नाणी, आलेख, ताम्रपट, शिलालेख.

**समारोप** – भौतिक साधनांचे महत्त्व.

क) **कुशाणांविषयी माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – कुशाणांनी भारतात कुठे साम्राज्य स्थापन केले?

कुशाण – मूळस्थान, सम्राट कनिष्क, व्यापाराची भरभराट, बौध्द धर्माचा प्रसार.

**समारोप** – एकूणच परकीयांचा भारतीय संस्कृतीतील सहभाग महत्त्वाचा.

ड) **पाल, प्रतिहार आणि राष्ट्रकूट यांची माहिती देऊन त्यांच्यातील संघर्षाची माहिती द्या.**

**प्रस्तावना** - या सत्तांचा कालखंड तिन्ही सत्तांची थोडक्यात माहिती (स्थान, महत्त्वाचे राजे, ६ योगदान) संघर्षाची कारणे - राजकीय पोकळी व आर्थिक सामर्थ्य प्राप्त करणे, शेवटी विजय प्रतिहारांचा.

**समारोप** - संघर्ष असूनही इतिहासामध्ये या सत्तांचे महत्त्वपूर्ण योगदान.

**प्र. ५) खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

अ) **आर्यांचे राजकीय जीवन**

**प्रस्तावना** - आर्यांचे आगमन.

राजकीय जीवन - टोळी पध्दती, वंशशाखा, राजा, गणराज्य, राजाची कर्तव्ये, बळी, धार्मिक व नैतिक बंधने, प्रशासन.

**समारोप** - आर्यांनी भारतातील राजकीय व्यवस्थेचा पाया घातला. पुढील काळात या पायावरच अनेकविध राज्यांची उभारणी.

ब) **इ.स. पूर्व सहाव्या शतकातील शेतीचा विकास**

**प्रस्तावना** - प्राचीन काळात शेती हाच प्रमुख व्यवसाय जमीन राजाच्या मालकीची, छोटे शेतकरी, जमीनदार व ब्राह्मण,कूळ नव्या वसाहती, लोखंडी फाळाचा वापर, जलसिंचनाच्या सोयी, भरभराट, राजसत्तेची मदत, पिके, शेतीवरील कराची व शेतीसंबंधी प्रशासनाची सुरुवात.

**समारोप** - आर्यांच्या काळात शेती व त्या अनुषंगाने अर्थव्यवस्था व प्रशासन यांची पायाभरणी.

क) **राष्ट्रकुटांचे योगदान**

**प्रस्तावना** - राष्ट्रकुटांच्या सत्तेचा परिचय.

राष्ट्रकूट - ज्ञान,विज्ञान, शिक्षण, साहित्य यांना उत्तेजन, वास्तुकला व शिल्पकला यांचा प्रसार - लेणी.

**समारोप** - आजही लेण्यांच्या रूपाने राष्ट्रकुटांच्या योगदानाची साक्ष.

ड) **विस्तीर्ण भारत**

**प्रस्तावना** - संकल्पनेचा अर्थ - भारतीय संस्कृतीच्या प्रसार जगभरात झाल्याने भारताची व्याप्ती वाढली. ही व्याप्ती म्हणजेच विस्तीर्ण भारत व्यापार व राजकीय विस्तार यामुळे परदेशांशी संबंध, संबंधित देश राजसत्ता, धर्म, स्थापत्य, साहित्य, ज्ञान विज्ञान यांचे संक्रमण

**समारोप** - भारताची ही सांस्कतिक व्याप्ती भारताच्या राजकीय सामर्थ्याची व सांस्कतिक संपन्नतेची साक्ष देते.

# मराठ्यांचा इतिहास (इ. स. १६३० ते १८१८) - (HS – 2)

**प्र. १) मराठी राज्याच्या उदयास कारणीभूत ठरलेल्या घटकांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – ग्रँट डफची मराठी राज्याच्या उदयाची कारणमीमांसा.
मराठी राज्याच्या उदयास कारणीभूत घटक – महाराष्ट्राची भौगोलिक वैशिष्ट्ये, मराठी लोकांची वैशिष्ट्ये. राजकीय परिस्थिती – अनुकूल व प्रतिकूल घटक, संतांची कामगिरी, इतर पूरक घटक – आई, वडील, गुरू, जहागीर, शिवाजीमहाराज.
**समारोप** – या राज्यस्थापनेचे महत्त्व.

**प्र. २) छत्रपती संभाजीच्या कारकिर्दीचा आढावा घ्या.**

**प्रस्तावना** – संभाजीचा पूर्वेतिहास व राज्यारोहण, संभाजीमहाराजांचे कार्य – शहजादा अकबरास पाठिंबा, सिद्दीशी युध्द, पोर्तुगिजांवर आक्रमण, मुघलांशी संघर्ष, अन्य आक्रमणे, कर्नाटकातील मोहीम, शेवट.
**समारोप** – संभाजीच्या कारकिर्दीचे मूल्यमापन (मूल्यमापन करताना संभाजीच्या चरित्रातील चांगल्या व वाईट दोन्ही बाजूंचा विचार करणे अपेक्षित)

**प्र. ३) पेशवा माधवराव पहिला याच्या काळातील मराठी सत्तेच्या पुनर्स्थापनेसाठी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घ्या.**

**प्रस्तावना** – पार्श्वभूमी.
निजामाचा पराभव हैदरवरील स्वाऱ्या उत्तरेतील राजकारण व प्रभावाची पुनर्स्थापना, जाटांशी समेट
**समारोप** – मूल्यमापन.

**प्र. ४) खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) सिद्दी जौहरच्या मोहीमेची माहिती द्या.**

**प्रस्तावना** – इ.स. १६६० मध्ये स्वराज्यावर आदिलशाही सरदार सिद्दी जौहर याचे आक्रमण
पार्श्वभूमी – अफझलखानाचा पराभव व मृत्यू, सिद्दी जौहरची मोहीम – पन्हाळ्यास वेढा व शिवाजीराजांचे पलायन, पावनखिंडीचा लढा.
**समारोप** – यशानंतरही शायिस्तेखानाच्या स्वारीच्या दबावामुळे आदिलशाहीशी समेट.

**ब) शाहू-ताराबाई संघर्षाची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – शाहूच्या सुटकेनंतर शाहू व ताराबाई यांच्यात संघर्ष
संघर्षाची कारणे – शाहू सत्तेचा कायदेशीर वारस, पण मोगलांच्या कैदेत, ताराबाईचा पक्ष – शिवाजीचे राज्य संभाजीच्या मत्यूबरोबर संपुष्टात, पुढे राजारामाने स्वतंत्र राज्य संपादले, शिवाजीला संभाजी हा वारस म्हणून मान्य नव्हत. संघर्ष – खेडची लढाई, सातारा – शाहूची राजधानी, कोल्हापूर भागात ताराबाईचे वर्चस्व, मुघल दरबारचा कौल, शाहूचा पक्ष बळकट होतो, कोल्हापूरमध्ये सत्तांतर व संघर्षाचा शेवट. **समारोप.**

**क) मराठेशाहीच्या ऱ्हासाची कोणतीही सहा कारणे लिहा.**

**प्रस्तावना** – मराठी सत्तेचा अस्त कधी व कसा? कारणे (खालीलपैकी कोणतीही ६ कारणे)
मध्यवर्ती सत्तेचा अभाव, सततची सत्तांतरे, वतनदारी पध्दतीचे पुनरुजीवन, देशाभिमानाचा अभाव, शिवकाळातील मार्गदर्शक तत्त्वांपासून फारकत, राजकीय धोरणात बदल, लष्करी क्षेत्रातील कमतरता, हेरखात्याकडे दुर्लक्ष, लष्करात शिस्तीचा अभाव, आरमाराकडे दुर्लक्ष, आर्थिक दिवाळखोरी, चौथाई व सरदेशमुखीची वसुली, कर्जबाजारीपणा, व्यापाराची पिछेहाट, खालावलेली प्रतिमा, नैतिकतेचा अभाव, नेतृत्वाचा अभाव, मराठी समाजाचे सांस्कृतिक मागासलेपण .
**समारोप** – ब्रिटिशांची सत्तास्थापना व आधुनिक इतिहासाची सुरुवात .

ड) **मराठेकालीन जातिव्यवस्थेची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – मराठेशाहीत सर्व क्षेत्रांवर जातिव्यवस्थेचा पगडा

मराठेकालीन जातिव्यवस्था – जात जन्मावर आधारित, व्यवसाय जातीवर आधारित, श्रमविभागणी, ब्राह्मणांचे वर्चस्व, उपजाती, बंधने, जातीजातीतील संघर्ष, विषमता, अस्पृश्यता, गोतसभा.

**समारोप** – मराठेशाहीत जातिसंस्थेची बंधने सैल होण्यास सुरुवात.

**प्र. ५) खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

अ) **जावळी प्रकरण**

**प्रस्तावना** – शिवाजीराजांच्या जावळी प्रकरणापूर्वीच्या हालचाली.

जावळी प्रकरण – जावळी प्रदेशाची भौगोलिक रचना व महत्त्व, जावळीवर हल्ला करण्यामागील हेतू – मोऱ्यांचा उपद्रव, अनुकूल राजकीय परिस्थिती, जावळीवर हल्ला व जावळी काबीज, जावळी मिळाल्याचे फायदे – सैन्यात वाढ, राज्य दुप्पट, दुर्गम भागाचा सामरिक फायदा, कोकणात प्रवेश, प्रतापगडाची बांधणी, अन्य किल्ले व खजिन्याचा ताबा, मुरारबाजीसारखा सहकारी.

**समारोप** – जावळी प्रकरणाचे आदिलशाही दरबारातील पडसाद.

ब) **आग्र्याहून सुटकेचा प्रसंग**

**प्रस्तावना** –आग्राभेट (४ ते ५ ओळीत)

आग्राहून सुटका – सोबतच्या बऱ्याच लोकांची महाराष्ट्रात पाठवणी, आजारपणाचे सोंग, दानधर्म, खोट्या शिवाजीची योजना, पलायन, औरंगजेबाची प्रतिक्रिया, बैराग्यांच्या रुपात स्वराज्यात आगमन, मार्ग.

**समारोप** – पलायनाचे परिणाम.

क) **बाजीराव-निजाम संबंध**

**प्रस्तावना** – बाजीराव व निजाम यांच्यामध्ये निजामाच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळे व मराठ्यांच्या विस्तारवादी धोरणामुळे संबंध, बाजीराव-निजाम संबंध – निजामाकडून मराठ्यांमधील फुटीला प्रोत्साहन, पालखेडची लढाई व निजामाचा पराभव, फुटीरांचा बंदोबस्त, रोहे रामेश्वरचा समझोता, भोपाळची लढाई व निजामाचा पराभव.

**समारोप** – बाजीराव निजाम संघर्षामुळे मराठी राज्याला अंतर्गत व बाहेरून धोका, राज्याचे स्थैर्य धोक्यात.

ड) **शिवकालीन व पेशवेकालीन प्रांतिक प्रशासन**

**प्रस्तावना** – युध्दांच्या धामधुमीतही मराठ्यांनी प्रशासनाची घडी बसविण्याचा प्रयत्न केला.

शिवकालीन प्रांतिक प्रशासन – सर्वसाधारण रचना.

पेशवेकालीन प्रांतिक प्रशासन – सर्वसाधारण रचना.

मराठेकाळातील प्रांतिक प्रशासकीय अधिकारी – देशमुख, देशपांडे, मामलतदार, कमाविसदार, दरखदार, वतनी अधिकारी.

**समारोप** – या व्यवस्थेमुळे राज्यकारभाराला स्थैर्य.

# MS - Office (Office Automation) (Theory)

**(40mks)**

**Q1 Answer the following** **(20mks)**

1. Explain the clipboard in detail.
2. Write a note on Master slide.
3. Describe how to create database in Access.
4. What is Macro in word? Explain steps to create macro.

**Q 2 Answer the following in detail.** **(20mks)**

1. Describe relational database. Explain with an illustration how to create a simple relationship.
2. Describe in detail the steps to create mail merge.

-----------